महसूल विभाग

7 मार्च 2012

## ग्रामीण भागातील छोट्या व्यवसायांना अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही

ग्रामीण भागातील निवासी इमारतीतील छोटी दुकाने, किराणा दुकान, पिठाची गिरणी, कांडप मशीन इत्यादी व्यवसायांसाठी आता अकृषिक परवानगीची आवश्यकता राहणार नसल्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या सुधारित धोरणामुळे ग्रामीण भागात छोटे व्यवसाय सुरु करणाऱ्यांना अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. हे धोरण फक्त वैयक्तिक निवासी वापराखालील इमारतीतील ज्या उपक्रमांचे क्षेत्रफळ 40 चौरस मीटर (430 चौरस फूट) पेक्षा जास्त नाही, अशा सूक्ष्म उपक्रमांना लागू राहणार आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील कलम 42 नुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय शेत जमिनीचे शेती व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी रुपांतर करता येत नव्हते. सन 2007 मध्ये कलम 42 मध्ये सुधारणा करुन, ग्रामीण भागात जमीनधारकास वैयक्तिक निवासी वापरासाठी अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता काढून टाकण्यात आली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या कलम 42 मध्ये सुधारणा करण्यासाठी येत्या अधिवेशनात विधेयक मांडण्यात येईल. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर हे सुधारित धोरण अंमलात येईल. या सुधारित धोरणामुळे ग्रामीण भागातील सूक्ष्म उपक्रम सुरु करणाऱ्या लोकांना अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. तथापि, रुपांतरित कर आणि अकृषिक आकारणी नियमाप्रमाणे लागू राहील.

----00------